॥ भिल्लाचा पोर ॥

कवि: गोपीनाथ

उंच उंच डोंगर भवतीं। चढले नील नभांत
भिरभिर वारा व्यापुनियां। टाकी सारा प्रांत. १

तरुवेलींनीं फुललेल्या। त्या खोऱ्यांत सुरेख
झुळझुळ वाहे निर्झरिणी। स्फटिकावाणी एक. २

तोंच कुणी चपळाईनें। डोंगर वेंघुन थोर
करवंदें विकण्यासाठीं। ये भिल्लाचा पोर. ३

शाळिग्रामासम काळा। देह कसा घोटींव
तेजदार नागावाणी। दिसे कोवळा जीव. ४

स्वच्छ गोल डोळ्यांत नसे। भीतीचा लवलेश
साधा भोळा भाव मुखीं। आणि दिसे आवेश. ५

ओठ चिमुकले विलग जरा। होती मधुन मधून
शुभ्र हिरकण्यांसम दिसती। दंत किती शोभून. ६

एक करीं घेउनि परशू। दुसऱ्या हातीं द्रोण
" करवंदें घ्या करवंदें" । सांगतसे गर्जून. ७

असेल याची पर्णकुटी। जवळच रम्य निवान्त
मातापितरांसह तेथें। रहात हा सौख्यांत. ८

स्वातंत्र्याचा खराखुरा। शाहिर आहे हाच
नागरवस्तीचा नाहीं। या जीवाला जाच. ९

पक्ष्यांचीं ऐकत गाणीं। देत तयांना ताल
हिंडावें रानोरानीं। आनंदांत खुशाल. १०

घाट सोडुनी कधींच ये। गाडी निघुनी दूर
परि न हले डोळ्यांपुढुनी। तो भिल्लाचा पोर. ११